जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ३८ दिनांक - २५/०१/२०२२**

येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर

**घरफोडी करुन मोबाईल चोरी करणारे येरवडा पोलीस स्टेशनच्या तपास पथक कडून अटक**

दि. २३/०१/२०२२ रोजी येरवडा पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत असताना तपास पथकातील सपोफौ प्रदिप सुर्वे व पोशि अजित वाघुले यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, जयप्रकाश नगर येरवडा पुणे येथे दोन इसम उभे असून त्याचे जवळ चोरीचे मोबाईल आहेत. सदरची बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळवून त्यांनी कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी पोउपनि अंकुश डोंबाळे, व स्टाफ यांनी सदर ठिकाणी सापळा रचून दोन इसम पळून जात असताना पकडले त्यांना नाव पत्ता विचारता असता १. रुपेश दिलीप अडागळे वय २३ रा जयप्रकाश नगर येरवडा पुणे २. अक्षय सुदाम जमदाडे वय २२ रा गांधीनगर येरवडा पुणे त्यांचे ताब्यातील २ मोबाईलबाबत चौकशी केली असता त्यांनी चोरी केल्याचे कबूल केले आहे. सदरबाबत येरवडा पोलीस स्टेशन येथे गु र नं २५/२०२२ भादवि ४५७ ३८० ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात आरोपींना अटक करण्यात आली असून तपासा दरम्यान त्यांनी आणखी २ गुन्हे केल्याचे कबूल केले आहे. सदर बाबत येरवडा पो स्टे गु र नं २६/२०२२ भादवि ४५७ ३८० ३४ व येरवडा पो स्टे गु र नं २७/२०२२ भादवि ४५७ ३८० ३४ असे एकूण ३ गुन्हे उघडकीस आलेले असून गुन्हयातील चोरीस गेलेले ७ मोबाईल व इतर ३ मोबाईल असे एकूण १० मोबाईल ३९८००/- रु किंमतीचे मिळून आलेले आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास पथकाचे पोउपनि अंकुश डोंबाळे करत आहेत.

सदरची कामगिरी मा.रोहिदास पवार,पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४, मा.किशोर जाधव सहा. पोलीस आयुक्त, येरवडा विभाग, श्री. युनुस शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा, श्री. विजयसिंह चौहान पोलीस निरीक्षक गुन्हे, येरवडा यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि अंकुश डोंबाळे, सपोनि रविंद्र आळेकर, सपोफौ प्रदिप सुर्वे, पोहवा गणपत थिकोळे, पोशि अजित वाघुले, पोना किरण घुटे, पोना कैलास डुकरे, पोना अमजद शेख पोशि राहुल परदेशी, पोशि अनिल शिंदे यांनी केलेली आहे.


येरवडा पोलीस स्टेशन